# पश्चिम विदर्भातील संत : राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्याचे ग्रंथसूचीत्मक अध्ययन

**प्रा. डॉ. कविता मुरलीधरराव इंगळे** ग्रंथपाल स्व. पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महा. वरूड

---

**सारांश (Abstract) :-**

ग्रंथसूची हा असा विषय आहे की, जो ज्ञानाच्या व संशोधनाच्या सर्व क्षेत्राशी संबंधीत आहे. वैज्ञानिक किंवा संशोधक हे ग्रंथसूची या संदर्भ साधनावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात. कारण ग्रंथसूचीच्या साहाय्याने जगामध्ये आतापर्यंत निर्माण झालेल्या आणि सध्या निर्माण होत असणाऱ्या ज्ञानाचा शोध घेता येतो. प्रस्तुत शोध निबंधामध्ये देखील वैदर्भिय संत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांवरील साहित्य तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखित साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना :-**

माहिती तंत्रज्ञानामुळे ज्ञानाच्या कक्षाही रूंदावत आहेत. ज्ञानामध्ये तसेच माहितीमध्ये झपाट्याने होत असलेली वाढ व त्यातुन निर्माण होणारे साहित्य यांच्या व्यवस्थापनासाठी योग्य व परिपूर्ण अशा ग्रंथालयाची निर्मिती करणे आवश्यक आहे.

जागतिकीकरणाच्या युगात ज्ञानअधिष्ठीत समाज निर्मितीचे कार्य हे सक्षम ग्रंथालयाव्दारेच अपेक्षित आहे. तथापी कोणत्याही देशाच्या बौध्दिक तसेच सामाजिक प्रगतीत ग्रंथालयाचा फार मोठा वाटा असतो. या अनुषंगाने ग्रंथालयाची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते. कोणत्याही ग्रंथालयात दिल्या जाणाऱ्या संदर्भ सेवेअंतर्गत 'ग्रंथसूची' ही एक संदर्भ सेवा होय.

ग्रंथसूची हे संदर्भसेवेचे असे एक साधन आहे की, ज्यामध्ये पूर्ण प्रकाशित झालेल्या व पुढेही वाढत्या प्रमाणात प्रकाशित होत असलेल्या अगणित लेखन सामुग्रीतील वाचकाला हवे ते नेमके साहित्य उपलब्ध करून देणे हे फार कठीण काम आहे. मात्र आज ग्रंथसूचीसारख्या साधनाव्दारे ते काम सुकर झालेले आहे.

पश्चिम विदर्भामध्ये अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशिम या जिल्ह्यांचा समावेश होतो. या क्षेत्रामध्ये समाजसुधारणा, समाजविकास, समाजोध्दार, मूल्यसंरक्षण व विधायक कार्याच्या दृष्टीकोणातून अनेक संतांनी कार्य केलेले आहे. त्या संतांपैकी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे एक होय. राष्ट्रसंतांनी स्वत:च्या अनुभवातुन व आत्मसाक्षात्कारातून लिहिलेल्या तसेच राष्ट्रसंतांनी केलेल्या कार्यावर इतर लेखकांनी 2019 पर्यंत लिहिलेल्या व प्रकाशित झालेल्या साहित्यांचा ग्रंथसूचीत्मक अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे अमरावती जिल्ह्यातील यावली या गावी जन्माला आलेला 19 व्या शतकातील हिरा आहे. त्यांनी मानवी समाजाच्या कल्याणाच्या हेतूनेच आपल्या किर्तने, प्रवचणे, भाषणे इत्यादी साहित्यातून अनुभवाचे सार दिलेले आहेत. राष्ट्र जागृतीचे महान कार्य त्यांनी भाषणे, भजन, किर्तने, यांच्या माध्यमातून केले. भारतीय समाजातील अंधश्रध्दा, अनिष्ट रुढी-परंपरा बंद करण्यासाठी खुप प्रयत्न केले. पशुहत्याबंदी, व्यसनमुक्ती, अस्पृश्योध्दार, जोतीनिर्मूलन, यात्राशुध्दी, कुटूंबनियोजन, हुंडाबंदी इत्यादी कार्यांनाही त्यांनी चालना देऊन लोकजागृती केली.

श्रेष्ठ जनसारस्वत राष्ट्रसंत हे आधुनिक काळातील महान प्रज्ञावंत सत्पुरूष होते. स्वतंत्र भारतातील शेवटचा माणूस जोपर्यंत परावलंबी उपेक्षित जीवन जगत असेल तोपर्यंत भारताला खऱ्या अर्थाने स्वतंत्र म्हणता येणार नाही. अशी त्यांची धारणा होती. ग्रामविकासाचा विचार त्यांनी आपल्या साहित्यातून सहज सोप्या भाषेतून ग्रामीण जनतेच्या अध्यात्मिक, सामाजिक, मानसिक, विकासाकरीता मांडलेला आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्याचा अभ्यास होणे अनिवार्य ठरतो.

**संशोधन क्षेत्र :-**

संशोधन क्षेत्र हे संपूर्ण पश्चिम विदर्भ असून त्यातील अमरावती जिल्हा ही राष्ट्रसंतांची जन्मभूमी व कर्मभूमी या अनुषंगाने येथे अभ्यासली गेली आहे. राष्ट्रसंतांनी आपले साहित्य हे हिंदी, मराठी, इंग्रजी एवढेच नव्हे तर उर्दू मध्येही ग्रामगीता भाषांतरीत करण्यात आलेली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाशी संबंधी साहित्य विविध 22 वङ्मय प्रकारात उपलब्ध आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखीत ग्रंथ आणि त्याच्याशी संबंधीत इतर लेखकांव्दारे लिखित ग्रंथांमध्ये 74.23% ग्रंथाचे प्रकाशन 1971 नंतरच झालेले निदर्शनास आले. याचे अध्ययन या संशोधन लेखात आलेले आहे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनामध्ये वर्णनात्मक तसेच सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**संशोधनाचे महत्व :-**

ग्रंथसूची हा असा विषय आहे की, जो ज्ञानाच्या व संशोधनाच्या सर्व क्षेत्राशी संबंधीत आहे. ज्ञानिक किंवा संशोधक हे ग्रंथसूची या संदर्भसाधनावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतात. कारण जगामध्ये आतापर्यंत निर्माण झालेल्या आणि सद्यपरिस्थितीत निर्माण होत असणाऱ्या ज्ञानाचा शोध ग्रंथसूचीच्या साहाय्याने घेता येतो. सद्य:स्थितीत आपल्या विषयाशी संबंधीत क्षेत्रामध्ये कोणकोणते साहित्य उपलब्ध आहेत किंवा प्रकाशित झालेले आहे याची माहिती संशोधकाला असायला

पाहिजे. म्हणजेच संशोधक हा माहितीच्या बाबतीत अद्ययावत असायला पाहिजे. परंतू आता महितींचा विस्फोट होत आहे. अशा परिस्थितीत संशोधकाल पाहिजे असलेली नेमकी व योग्य माहिती ही मात्र ग्रंथसूचीव्दारे मिळू शकते.

ग्रंथसूची या अभ्यासकाला, संशोधकाला लेखकांना ग्रंथपालांना आणि विविध प्रशासकीय व्यावसायिकांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रातील ज्ञान निदर्शनास आणून देते. या दृष्टीने ग्रंथसूची हे अभ्यासाचे आणि संशोधनाचे अत्यंत उपयुक्त साधन आहे.

ग्रंथालयातील वाचन साहित्याचे डिजीटायझेशन व्हावे हे उच्च शिक्षणाचे धोरण आहे. एवढेच नव्हे तर नविन शैक्षणिक धोरणामध्येही ग्रंथालयांना प्रोत्साहित केल्या जात आहे. अशावेळी ग्रंथसूची हे ग्रंथालयातील संदर्भसूचीचे एक महत्वाचे साधन म्हणून उपयोगी पडते.

**संशोधनाचा उद्देश :-**

1) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी लिहिलेल्या व या संतावर इतर लेखकांनी लिहिलेल्या साहित्याचा विविध संदर्भ साधनांमधून शोध घेणे.
2) तुकडोजी महाराजवळील साहित्याचे एकत्रीकरण करून त्यातील विविध विषयांवर प्रकाश टाकणे.
3) राष्ट्रसंतांच्या साहित्याचा कालखंडनिहाय अभ्यास करणे.
4) राष्ट्रसंतांच्या साहित्याचा भाषानिहाय अभ्यास करणे.
5) विषयानुसार व लेखकानुसार राष्ट्रसंतांच्या साहित्य ग्रंथांची क्रमवारी निश्चित करणे.

**संशोधनाची गृहीतके :-**

1) राष्ट्रसंतांनी केलेल्या कार्यावर अनेक लेखकांनी लेखन केलेले आहे व संशोधकानी संशोधनही केलेले आहे.
2) राष्ट्रसंतांच्या साहित्याची बरिचशी निर्मिती ही मराठी व हिंदी भाषेत झालेली आहे.
3) राष्ट्रसंतांनी समाजाला प्रेरक ठरेल अशा साहित्याचे विविध विषयावरील लेखन केलेले आहे.
4) पश्मिच विदर्भातील संत साहित्यामध्ये सर्वात जास्त गंथ लेखन हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांवर झालेले आहे.

**सारणी क्रमांक 1**

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि इतर लेखकाव्दारे लिखीत ग्रंथांची लेखकनिहाय विश्लेषण दर्शक सारणी**

**सारणी क्र. १**

| 1 | लेखकाचे नांव | एकूण | सरासरी % |
|---|---|---|---|
| 2 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | 72 | 32.43 |
| 3 | रघुनाथ कडवे | 54 | 24.32 |
| 4 | सुदाम सावरकर | 17 | 7.66 |
| 5 | रा. मो. बेलूरकर | 09 | 4.05 |
| 6 | बाबा मोहोड | 08 | 3.60 |
| 7 | ज्ञानेश्वर रक्षक | 04 | 1.80 |
| 8 | राम घोडे | 04 | 1.80 |
| 9 | भाऊ मांडवकर | 04 | 1.80 |
| 10 | अच्युत महाराज | 04 | 1.80 |
| 11 | ल. मा. नारखेडे | 02 | 0.90 |
| 12 | रा. श. ठोसर | 02 | 0.90 |
| 13 | उत्तम कंकाळे | 02 | 0.90 |
| 14 | भा. मो. वाडेकर | 01 | 0.45 |
| 15 | अब्दुल गफूर पारेख | 01 | 0.45 |
| 16 | जगसिंहपाल पटेल | 01 | 0.45 |
| 17 | जनार्दन दास | 01 | 0.45 |
| 18 | अशोक राणा | 01 | 0.45 |
| 19 | रघुनाथ कारमोरे | 01 | 0.45 |
| 20 | सुरेंद्र बुराडे | 01 | 0.45 |
| 21 | निळकंठ हळदे | 01 | 0.45 |
| 22 | केशवराव डोंगरे | 01 | 0.45 |
| 23 | सरीता पुंजे | 01 | 0.45 |
| 24 | केशव मालवनकर | 01 | 0.45 |
| 25 | गुरूदेव प्रकाशन | 01 | 0.45 |
| 26 | वसंत उल्हे | 01 | 0.45 |
| 27 | पुष्पाताई बोंडे | 01 | 0.45 |
| 28 | बाबाराव गेडाम | 01 | 0.45 |
| 29 | गुरूदास खवसे | 01 | 0.45 |
| 30 | वे. भ. श्रीखंडकर | 01 | 0.45 |
| 31 | किसनलाल मुंधडा | 01 | 0.45 |
| 32 | रूपराव वाघ | 01 | 0.45 |
| 33 | विजय मंथनवार | 01 | 0.45 |
| 34 | अ. ना. देशपांडे | 01 | 0.45 |
| 35 | संतोष सुर्यवंशी | 01 | 0.45 |
| 36 | बाळ पदवाड | 01 | 0.45 |
| 37 | थुटे भाऊ | 01 | 0.45 |
| 38 | दत्ता कुलकर्णी | 01 | 0.45 |
| 39 | कुमुदिनी खोरगडे | 01 | 0.45 |
| 40 | नमीता शेंदरे | 01 | 0.45 |
| 41 | श्याम लोहबरे | 01 | 0.45 |
| 42 | पी. एम. काने | 01 | 0.45 |
| 43 | एकनाथ गावंडे | 01 | 0.45 |
| 44 | सुभाष सावरकर | 01 | 0.45 |

| | | | |
|---|---|---|---|
| 45 | पुरूषोत्तम पारनेरकर | 01 | 0.45 |
| 46 | मो. श. पुनसे | 01 | 0.45 |
| 47 | विमला ठक्कर | 01 | 0.45 |
| 48 | रुपराव वाघ | 01 | 0.45 |
| 49 | केशवराव रामटेके | 01 | 0.45 |
| 50 | मधुकर केचे | 01 | 0.45 |
| 51 | पुरूषोत्तम मिराशी | 01 | 0.45 |

वरील सारणी क्र. १ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि इतर लेखकाव्दारे लिहिलेल्या ग्रंथाचे लेखक निहाय विश्लेषण करण्यात आले आहे. सर्वाधिक 72 (32.43%) ग्रंथाचे लेखन स्वत:हा महाराजांनी केले आहे. इतर 50 लेखकांनी महाराजांच्या जीवन व साहित्यावर लेखन केले असल्याचे आढळून येते. त्यामध्ये प्रामुख्याने रघुनाथ कडवे 54 (24.32%) ग्रंथ, सुदाम सावरकर 17 (7.66%) ग्रंथ, बाबा मोहोड 08 (3.6%) ग्रंथ, रा. मो. बेलूरकर 09 (4.05%) ग्रंथ, राम धोडे, भाऊ मांडवकर, ज्ञानेश्वर रक्षक आणि संत अच्युत महाराज यांच्या प्रत्येकी 04 (1.80%) ग्रंथांचा समावेश होतो. इतर अन्य लेखकांनी त्यांच्या जीवन व साहित्यावर 1 किंवा 2 ग्रंथ प्रकाशित केल्याचे आढळून येते. थोडक्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांवर मोठ्या प्रमाणावर लेखकांनी लेखन करून त्यांचे प्रकाशन केल्याचे स्पष्ट होते.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांशी संबंधीत ग्रंथांची भाषा निहाय विश्लेषण दर्शक सारणी**

**सारणी क्र. 2**

| अ.क्र. | भाषा | ग्रंथांची संख्या | एकूण ग्रंथ संख्येशी प्रमाण % | संचयी प्रमाण % |
|---|---|---|---|---|
| 1 | मराठी | 162 | 72.97 | 72.97 |
| 2 | हिंदी | 49 | 22.07 | 95.04 |
| 3 | इंग्रजी | 08 | 3.60 | 98.64 |
| 4 | गुजराती | 01 | 0.45 | 99.09 |
| 5 | पोवारी | 01 | 0.45 | 99.54 |
| 6 | उर्दू | 01 | 0.45 | 99.99 |
| | **एकूण** | **222** | **100.00** | **100.00** |

वरील सारणी क्र. 2 मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज तसेच इतर लेखकांनी लिहिलेल्या ग्रंथांची भाषानिहाय माहिती देण्यात आलेली आहे. वरील सारणीत दिलेल्या माहितीच्या आधारे असे आढळून येते की, सर्वात जास्त म्हणजे 162 (72.97%) ग्रंथ मराठी भाषेत प्रकाशीत झालेले आहे. त्याखालोखाल 49 (22.07%) ग्रंथ हिंदी भाषेत प्रकाशीत झाले आहे. तर इंग्रजी भाषेत 08 (3.62%) ग्रंथ प्रकाशित झालेले असून गुजराती, पोवारी व उर्दू या भाषेत प्रत्येकी 01 ग्रंथ असल्याचे आढळून आले. वरील सारणी वरून असे लक्षात येते की, मराठी भाषे खालोखाल हिंदी भाषेत ग्रंथ लेखन झाल्याचे आढळून येते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे साहित्य जवळपास सहा भाषेमध्ये प्रकाशीत झाल्याचे निदर्शनास आले.

**निष्कर्ष :-**

1) पश्चिम विदर्भातील संतामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांवर मोठ्या प्रमाणावर साहित्याची निर्मिती झालेली दिसून येते.

2) पश्मिच विदर्भातील संत साहित्याचा अभ्यास करतांना यातील बहुतांशी ग्रंथ साहित्य हे विदर्भामध्येच प्रकाशीत झाल्याचे स्पष्ट होते.

3) राष्ट्रसंतांनी लिहिलेल्या अनेक ग्रंथावरून या संतांनी स्वत: अनेक ग्रंथांचे लेखन केलेले आहे.

4) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामगीता ही जागतिक स्तरावर पोहोचलेली असून ती उर्दू, हिंदी, इंग्रजी, मराठी, पोवारी या विविध भाषेत उपलब्ध आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1) साखरे, राजेंद्र रमाकांत (2003) ग्रंथालय संदर्भ सेवा, तात्विक व प्रात्याक्षिक, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

2) मंचरकर, र. बा. (2008) मराठी संत साहित्याची प्रस्तुतता. वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य संपा. शिवाजीराव मोहिते, पुणे : कर्मवीर प्रकाशन.

3) कामत, अशोक (2003) विदर्भातील समाज पुरूष राष्ट्रसंत तुकडोजी महाराज संत साहित्य : काही अनुबंध पुणे : पद्मगंधा प्रकाशन.

4) पाटील, व्ही. बी. (2012) महाराष्ट्राचा सर्वांगीण इतिहास, पुणे : के सागर.

5) कुलकर्णी, व. वि. (अनु. 2002) संदर्भ सेवा आणि संदर्भ साधने नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.